# ... तर 'वक्फ बोर्डा'च्या असंवैधानिक मागण्या निरस्त होतील

## अतुल भातखळकरांच्या विजयासाठी मनोज तिवारींचे आवाहन

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

''अतुल भातखळकर विजयी झाले, तर 'वक्फ बोर्डा'ची असंवैधानिक मागणी निरस्त होईल. त्यामुळे भातखळकर यांच्यासह महायुतीच्या सर्व उमेदवारांना बहुमताने विजयी करा,'' असे आवाहन भोजपूरी सुपरस्टार, गायक आणि दिल्लीचे खा. मनोज तिवारी यांनी यांनी केले.

शुक्रवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी कांदिवली पूर्व विधानसभेत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, महायुतीचे उमेदवार अतुल भातखळकर यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. कांदिवली पूर्व मतदार संघातील पोईसरमध्ये ही जाहीर सभा आयोजित करण्यात आली. यावेळी भाजपचे विधानसभा अध्यक्ष आप्पा बेलवलकर, विधानसभा प्रभारी सुधीर शिंदे, आरपीआय विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ कोंडे, माजी नगरसेवक शिवकुमार झा, सुनीता यादव, प्रकोष्ठ मनोज झा, वॉर्ड अध्यक्ष रमण मिश्रा, भाजपचे विधानसभा महामंत्री संजय जैस्वाल उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करताना खा. मनोज तिवारी म्हणाले की,



''मी पाच वर्षांपूर्वी तुमच्याकडून अतुल भातखळकर यांच्यासाठी मतांचे दान मागायला आलो होतो. त्याचप्रमाणे पुन्हा तुम्ही भाजप समोरील बटन दाबून त्यांना विजयी करावे, अशी मागणी करायला आलो आहे. पण, यावेळी आपल्याला त्यांना फक्त आमदार बनवायचे नाही, यावेळी त्यांना मंत्री बनवायचे आहे. तुम्ही आज उत्तर भारतातून वेगवेगळ्या भागातून आला असाल, तरी आता तुमची ओळख आता मुंबईकर उत्तर भारतीय आहे. तुम्हाला पोईसरमध्ये काही समस्या उद्भवली, तरी मी आपले लोकप्रिय नेते अतुलजी भातखळकर आणि तुम्ही मोठ्या संख्येने विजयी केलेले खा. पीयूष गोयल एकत्र बसून ती सोडवू.''

### काँग्रेसने 'वक्फ'ला बेकायदेशीर अधिकार दिले

खा. मनोज तिवारी काँग्रेस आणि 'वक्फ बोर्डा'वर हल्ला करत म्हणाले की, ''काँग्रेसने 'वक्फ बोर्डा'ला कायद्यात तरतुदी करून असे अधिकार दिले की, उद्या 'वक्फ बोर्डा'ने तुमच्या घरावर दावा केला. तरी तुम्ही त्याविरोधात काही करू शकणार नाही. ज्या लोकांनी 'वक्फ बोर्डा'ला असे अधिकार दिले त्यांचे निवडणुकीत खातेही उघडता कामा नये. त्यामुळे ही निवडणूक यासाठी झाली पाहिजे की, अतुल भातखळकर विजयी झाले तर 'वक्त बोर्डा'च्या असंवैधानिक मागण्या निरस्त होतील. कारण, जोपर्यंत भारतीय जनता पक्ष आहे, तोपर्यंत कोणाचाही असंवैधानिक हट्ट चालू देणार नाही. आमचा मंत्रच 'सबका साथ, सबका विकास' आहे.''

# महायुतीचे 'संकल्पपत्र' म्हणजे काँग्रेसच्या फॅक्टरीतील खोटी वचने नाहीत!

## चित्रा वाघ यांचे काँग्रेसवर टीकास्त्र

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

''महायुतीसाठी 'संकल्पपत्र' म्हणजे फक्त कागदाचा डॉक्युमेंट नाही किंवा काँग्रेसच्या खोट्या फॅक्टरीसारखी खटाखट खोटी वचने नाहीत. आमच्यासाठी 'संकल्पपत्र' म्हणजे एक पवित्र डॉक्युमेंट आहे जे आपल्या आराध्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला प्रगतशील बनवेल,'' असे वक्तव्य भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी केले आहे. रविवार, १० नोव्हेंबर रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या हस्ते भाजपचे 'संकल्पपत्र' प्रसिद्ध करण्यात आले. यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली.

चित्रा वाघ म्हणाल्या की, ''भाजपचे संकल्प पत्र म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी



दाखवलेल्या मार्गावरून वेगवान वाटचाल करण्यासाठी आखलेली योजना आहे. या संकल्पपत्रात 'सबका साथ, सबका विकास' हेच आमचे ध्येय आहे. प्रामुख्याने उल्लेख करायचा झाला, तर आमच्या लाडक्या बहिणींना दरमहा २ हजार,१०० म्हणजेच वर्षाला २५ हजार, २०० रुपये मिळणार. २०२७ सालापर्यंत ५० लाख महिलांना लखपती दीदी बनवणार, ५०० बचतगटांसाठी एक हजार कोटींचा फिरता निधी उपलब्ध होणार. शेतकऱ्यांना कर्ज माफी मिळणार. शेतकरी सन्मान निधीत वाढ होऊन १२ हजार ऐवजी १५ हजार रुपये मिळणार आणि एमएसपीवर २० टक्के अनुदान देणार आहे. राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर राहणार, वीज बिलात ३० टक्के कपात होणार, सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देणार, वृद्ध पेन्शन धारकांना महिन्याला २ हजार, १०० म्हणजेच वर्षाला २५ हजार, २०० रुपयांचा आधार मिळणार, दहा लाख विद्यार्थ्यांना मिळणार दहा हजार रुपये विद्यावेतन आणि २५ लाख रोजगार निर्मिती करणार, प्रत्येक जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र' स्थापन करून दहा लाख उद्योजक घडवणार, सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत 'व्हिजन महाराष्ट्र २०२८' सादर करण्यात येईल,'' असे त्या म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या की, ''सबका साथ, सबका विकास' याची खूणगाठ मनाशी बांधलेल्या भाजप आणि महायुतीसाठी 'संकल्पपत्र' म्हणजे फक्त कागदाचा 'डॉक्युमेंट' नाही किंवा काँग्रेसच्या खोट्या फॅक्टरीसारखी खटाखट खोटी वचने नाहीत. तर आमच्यासाठी 'संकल्पपत्र' म्हणजे एक पवित्र 'डॉक्युमेंट' आहे, जे आपल्या आराध्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला प्रगतशील बनवेल,'' असेही त्या म्हणाल्या.

# केवळ २० मिनिटांसाठी थांबली होती 'मेट्रो-३'

## तांत्रिक अडचणींबाबत प्रशासनाचे स्पष्टीकरण

**मुंबई** : मुंबईतील पहिल्या भूमिगत 'मेट्रो' मार्गिका मुंबई 'मेट्रो-३'ने साडेसहा लाख प्रवासी वाहतुकीचा टप्पा गाठला आहे. मात्र अशावेळी या प्रवासात काहीवेळा प्रवाशांचा तांत्रिक अडचणींमुळे खोळंबा झाल्याच्या घटनाही घडल्या आहे. अशीच एक घटना शनिवार, दि. ९ रोजी सहार रोड ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-१ स्थानकादरम्यान घडली. यावेळी प्रवाशांनी बोगद्यात अडकलेल्या ट्रेनमधून व्हिडिओ शूट करत 'मेट्रो-३' प्रशासनाला याबाबत स्पष्टीकरण मागितले. 'मेट्रो-३'नेही तांत्रिक कारणे विशद करत 'मेट्रो-३'वर झालेल्या विलंबामुळे प्रवाशांची दिलगिरी व्यक्त केली. मात्र यावेळी 'मेट्रो-३'ने ही ट्रेन एक तास बोगद्यात थांबली नसून केवळ २० मिनिटे थांबून असल्याची माहिती प्रशासनाने दिली. दरम्यान, एका प्रवासाने ट्विट करत 'मेट्रो-३' सहार रोड आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-१ स्थानकादरम्यान थांबून असल्याची माहिती दिली. ''यावेळी 'मेट्रो-३' मध्ये आम्ही मरोळपासून टी-१ स्थानकादरम्यान मागील एक तासापासून अडकलो आहोत,'' अशा आशयाचे ट्विट केले होते. यावर प्रशासनाने ''आमच्या टीमद्वारे त्रुटी ओळखून ती तत्काळ दुरुस्त करण्यात आली. प्रवाशांना त्यांचा पुढील प्रवासासाठी पर्यायी ट्रेन उपलब्ध करून देण्यात आली,'' असे म्हटले आहे.

# साडेचार कोटींच्या वस्तू प्रवाशांना मिळाल्या परत

## मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांची कामगिरी

**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या ऑन ड्युटी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांच्या हरवलेल्या व विसरलेल्या मौल्यवान वस्तू परत करण्याबाबत दाखविलेल्या तत्पर प्रतिसादाबद्दल प्रवाशांनी भारतीय रेल्वेचे आभार मानत कौतुक केले. मध्य रेल्वे आणि रेल्वे सुरक्षा दलाने जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ याकाळात तब्बल ४.६० कोटी रुपयांच्या वस्तू आणि सामान शोधले व प्रवाशांना परत केले आहे. प्रवासादरम्यान प्रवाशांच्या पर्स, बॅग, लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, क्रेडिट व डेबिट कार्ड यांसारख्या मौल्यवान वस्तू गाड्यांमध्ये आणि स्थानकांवर विसरल्याच्या आणि गहाळ झाल्याच्या अनेक घटना घडत असतात. यातील बहुतेक प्रकरणांमध्ये तक्रार नोंदवली गेली की नाही, याची पर्वा न करता भारतीय रेल्वेच्या कर्मचारी वर्गाने तपासणी व शोधकार्य सुरू ठेवले आणि बहुतेक प्रकरणांमध्ये अतिशय तत्परतेने प्रतिसाद दिलेला आहे. रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्याच्या मुख्य कर्तव्याव्यतिरिक्त 'अमानत' या ऑपरेशन अंतर्गत रेल्वे सुरक्षादल प्रवाशांना मदत करत आहे. जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान ऑपरेशन 'अमानत' अंतर्गत, रेल्वे सुरक्षा दलाने सुमारे ४.६० कोटी रुपये किमतीचे १ हजार, ३०६ प्रवाशांचे सामान परत केले आहे.

### विभागनिहाय तपशील

| विभाग | किंमत | प्रवाशी |
|---|---|---|
| मुंबई विभाग | २.२८कोटी | ५८० |
| भुसावळ विभाग | १ कोटी | २३० |
| नागपूर विभाग | ५९.३८ लाख | २९१ |
| सोलापूर विभाग | ३६.७५ लाख | ९२ |
| पुणे विभाग | ३५.२२ लाख | ११३ |

# पंडित सी. आर. व्यास हे गायकांचे गायक होते

## पद्मश्री एम. वेंकटेश कुमार यांनी जागवल्या स्मृती



**मुंबई, दि. १० : प्रतिनिधी**

''हा कार्यक्रम म्हणजे मला मिळालेली संगीताची सेवा करण्याची एक संधीच आहे. पंडित सी. आर. व्यास हे गायकांचे गायक होते. राग कसे गायचे, रागामध्ये भाव कसे आणायचे आणि शास्त्रीय गाण्यात शुद्धता कशी आणावी, हे त्यांनीच शिकवले. पंडितांच्या वागण्यात आणि गाण्यात दोन्हीत शुद्धता होती. पंडितजी हे गायक आणि नायक दोन्ही होते. त्यांच्यासारखे कलाकार खूप कमी होते,'' अशा भावना गायक पद्मश्री एम. वेंकटेश कुमार यांनी 'चिंतामणी-एक चिरंतन चिंतन' या ग्रंथाच्या प्रकाशनात व्यक्त केल्या.

पद्मभूषण पंडित सी. आर. व्यास यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून त्यांचा सांगीतिक जीवनाचा प्रवास उलगडून दाखवणाऱ्या 'चिंतामणी : एक चिरंतन चिंतन' या चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शनिवार, दि. ९ नोव्हेबर रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, '२५२', वीर सावरकर मार्ग, दादर (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला होता. 'गुणीजान रिसर्च आर्ट कल्चर ॲण्ड एज्युकेशन फाऊंडेशन' (ग्रेस) आणि 'पंचम निषाद' यांच्यातर्फे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रकाशन सोहळ्याला गायक पद्मश्री एम. वेंकटेश कुमार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. एम. वेंकटेश कुमार यांच्यासोबतच पॉप्युलरचे प्रकाशक रामदास भटकळ, सी. आर. व्यास यांचे सुपुत्र शशी व्यास आणि सतीश व्यास, अनिल व्यास या पुस्तकाच्या लेखिका श्रृती पंडित, अच्युत पालव, श्रद्धा पालव, विनय गवांदे, हर्षल भटकळ, संगीतकार कौशल इनामदार आणि अभिनेत्री मुक्ता बर्वे या मान्यवरांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रकाशनानंतर या चरित्र ग्रंथामधील निवडक भागांचे सुप्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे आणि सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी अभिवाचन केले. या दोघांनीही आपल्या अभिवाचनातून पुस्तकाप्रती वाचकांची जिज्ञासा आणि पुस्तक वाचण्याची त्यांची इच्छा यात भर घातली.

या चरित्र ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने प्रसिद्ध गायक पद्मश्री एम. वेंकटेश कुमार यांच्या गायन मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. केशव जोशी आणि अजय जोगळेकर यांनी त्यांना सांगीतिक साथ दिली. या मैफिलिने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आणि ग्रंथ प्रकाशन सोहळ्याची रंगत आणखी वाढवली. अस्मिता मोहिते यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### 'चिंतामणी-एक चिरंतन चिंतन' या पुस्तकाविषयी

'ग्रेस फाऊंडेशन'चे संस्थापक आणि सी. आर. व्यास यांचे सुपुत्र शशी व्यास यांच्या संकल्पनेतून आणि श्रुती पंडित व शशी व्यास यांच्या लेखणीतून साकार झालेल्या हा ग्रंथ शंभरीत पदार्पण केलेल्या 'पॉप्युलर प्रकाशन'तर्फे हा प्रकाशित करण्यात आला आहे. पंडित सी. आर. व्यास यांच्या सांगीतिक जीवनातील जडणघडणीसह, रागनिर्मितीचे तसेच बंदिशींच्या निर्मितीचे किस्से या पुस्तकाद्वारे संगीतप्रेमी व अभ्यासक यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाला मार्गदर्शन करण्यासाठी या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे. मोनिका गजेंद्रगडकर यांनी या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली आहे. अच्युत पालव यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ साकारले आहे.

**FORMAT C-2**

*(For political party to publish in website, newspapers, TV)*

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

*(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

Name of Political Party : **Bharatiya Janata Party**

Name of Election : **Maharashtra Legislative Assembly - 2024**

Name of State/UT : **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name constituency | Name candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | **151- Belapur** | **MANDA VIJAY MHATRE** | Name of Court, Case No. & Status of Case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence (s) | Name of Court & date (s) of Order (s) | Description of Offence(s) & punish- ment imposed | **Maximum Punisment Imposed** |
| 1 | | | JMFC Belapur, S.C.C. No. 2522/ 2019 Pending | IPC 171(D),171 (F) It is allegation of prosecution that the accused that voter to vote in 2 constituency in her speech hence complaint. | Nil | Nil | Nil |
| 2 | | | JMFC Belapur, S.C.C. No. 2924/ 2022 Pending | IPC 143, 145,188, 341, MPA-37 (3), (3)135, 333(1) (3) Since summons is not served upon me, I am not aware the contents of charge sheet. | Nil | Nil | Nil |
| 3 | | | JMFC Belapur, S.C.C. No. 3833/ 2023 Pending | IPC 143, 341,188, 269, 270, MPA-37 (1) (3) 139, 115/119 Since summons is not served upon me, I am not aware the contents of charge sheet. | Nil | Nil | Nil |

Name of constituency : **151- Belapur**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation................
**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

Place : Mumbai
Date : 06/11/2024

**This may be published in Newspapers and TV from the day following the last date for withdrawal of candidature and upto two days before the date of poll**

**Format CI-**
**(for candidate to publish in Newspapers, Tv')**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of lion'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India &Anr.)

**Name and address of candidate:** Mangal Prabhat Lodha, resident of 12 Anupam, 11 Manav Mandir Road, Mumbai 400 006

**Name of political party: Bharatiya Janata Party (Independent candidates should write "Independent" here)**

**Name of Election:** Maharashtra Legislative Assembly - 2024

***Name of Constituency: 185 Malabar Hill Assembly Constituency**

**I, MangalPrabhat Lodha, a candidate for the Maharashtra Legislative Assembly - 2024 abovementioned election, declare for public information the following details about my criminal antecedents**

**(A)Pending criminal cases**

| Sl No | Name of Court | Case No.and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | Metropolitan Magistrate, 40th Court at Girgaum Court. | Case No.440/PS/2024 Next Date: 18.11.2024 | For statement under Sec.313 of CRPC | Section 174 (a) and 147 of Railways Act, 1989. Alleged Political Demonstration, by stopping running of train |
| 2 | Bombay City Civil and Sessions Court, 54th Court at Mumbai | Sessions Case No.256 of 2021, Next Date: 10.12.2024 | For Cross Examination of PW1. | IPC 353, 332,341,143,147,149,188,269, 427, 504 a/w MPA 37,135, & PDPA 3, 4. Political motivated case against BEST escalated Bills during Lockdown. |

**(B)Details about cases of conviction for criminal offences**

| Sl No | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
|---|---|---|---|
| NA | NA | NA | NA |

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency